(1)

लोकसत्ता । ५.५.०४

# नालासोपाऱ्यात भांडणातून तरुणाची हत्या

**लोकसत्ता विशेष प्रतिनिधी**

**वसई :** नालासोपारा येथे तीन मित्रांमध्ये झालेल्या भांडणातून एकाची हत्या करण्यात आली आहे. यावेळी मारामारीत अन्य दोन मित्रही जखमी झाले असून, त्यांच्यावर रुग्णालयात उपचार सुरू आहे. ही हत्या नेमकी कुणी आणि कशी केली, ते अद्याप स्पष्ट झालेले नाही.

नालासोपारा पूर्वेतील गालानगर येथे दुबे यांचे चहाचे दुकान आहे. बुधवारी दुपारी हे दुकान बंद असताना दुबे यांचा मुलगा शिवम हा त्याचे दोन मित्र किशन झा आणि रोनक तिवारी यांच्याह आला होता. त्यांच्यात काही कारणावरून भांडण झाले. त्यात तिघेही जखमी झाले. त्यामध्ये रोनक तिवारी याचा मृत्यू झाला, तर किशन आणि शिवम यांच्यावर रुग्णालयात उपचार सुरू आहेत.

या प्रकरणाचा तपास आचोळे पोलीस आणि गुन्हे शाखा २ चे पथक करत आहेत. रोनक याच्यावर चाकूने हल्ला करण्यात आला आहे.

शिवम याच्या चेहऱ्यावरही मार लागला आहे. ही हत्या आपापसातील वादातून झाली आहे. एकमेकांवर हल्ला करण्यात किंवा बचाव करताना ते जखमी झाले असावेत, असे पोलिसांनी सांगितले. बाहेरील व्यक्ती चहाच्या दुकानात आलेला नाही. हे दोन्ही तरुण रुग्णालयातून परतल्यानंतर चौकशीत सत्य समोर येईल, असे पोलिसांनी सांगितले.

# माणिकपूर येथील घरफोडीत फिर्यादी महिलेचाच हात

## दोन आरोपींना अटक

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**वसई :** माणिकपूर येथे झालेल्या घरफोडीचा उलगडा करण्यात माणिकपूर पोलीस ठाणे गुन्हे शाखा २ च्या पथकाला यश आले आहे. याप्रकरणी पोलिसांनी दोन आरोपींना अटक केली आहे. ही चोरी फिर्यादी महिलेनेच घडवून आणलयाचे उघड झाले आहे. पतीने दिलेले पैसे खर्च झाल्याने तिने घरातील दागिने चोरीला गेल्याचा बनाव रचल्याचे तपासात उघड झाले आहे.

वसई पश्चिमेतील शास्त्रीनगर येथे संजेरी अपार्टमेंटमध्ये निकहत खान (३८) ही मुलींसह राहते. तिचा पती आखाती देशात नोकरी करतो. ९ मे रोजी तिच्या घरात अज्ञात चोरांनी घरफोडी करून साडेदहा लाखांचे सोन्याचे दागिने लंपास केले होते. याप्रकरणी माणिकपूर पोलीस ठाण्यामध्ये अज्ञात व्यक्तीविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला होता.

घरफोडीचा तपास माणिकपूर पोलिसांबरोबर गुन्हे शाखा २ चे पथक करत होते. याप्रकरणी पोलिसांनी बंगलवाडी येथून एका सराईत गुन्हेगाराला अटक केली. त्याच्या चौकशीत फिर्यादी महिलेनेच चोरीचा हा बनाव रचल्याचे उघड झाले. या बाबत माणिकपूर पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक संपतराव पाटील यांनी सांगितले की, या महिलेचा पती तिला खर्चासाठी भरपूर पैसे देत होता. मात्र तिच्याकडून हे पैसे खर्च झाले होते. आपला पती या पैशांचा हिशेब मागेल याची तिला भीती होती. त्यामुळे घाबरून तिने चोरीचा बनाव रचला. यासाठी तिच्याच इमारतीत राहणाऱ्या मित्राची मदत घेतली. तिच्या मित्राने एका सराईत चोराला सांगून ही चोरी घडवून आणली.

माणिकपूर पोलिसांनी यातील एका आरोपीला, तर गुन्हे शाखा २ च्या पथकाने एका आरोपीला अटक केली. तपासानंतर महिलेवर कारवाई केली जाणार असल्याचे पोलिसांनी सांगितले.

# विरारमध्ये दारूच्या अड्ड्यांवर कारवाई

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**वसई :** विरारमध्ये गावठी हातभट्टीची दारू तयार करणाऱ्या दोन अड्ड्यांवर पोलिसांच्या गुन्हे कक्ष ३ च्या पथकाने कारवाई केली आहे. या कारवाई दोन लाख १६ हजार रुपयांचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे.

वसई-विरार शहरातील विविध भागांत छुप्या मार्गाने हातभट्टी तयार केली जाते. विरार पूर्वेच्या हद्दीतील डोंगरात हातीभट्टीची दारू तयार केली जात असल्याची माहिती विरार गुन्हे शाखा ३ च्या पथकाला मिळाली होती. त्याआधारे तेथे छापा टाकला असता हातभट्टीची दारू तयार होत असल्याचे आढळून आले. या कारवाईत दारू तयार करण्यासाठीचे साहित्य, चार हजार लिटर नवसागर मिश्रित द्रव्य, २० लिटर दारू, असा एकूण दोन लाख १६ हजार रुपये किमतीचा मुद्देमाल आढळला. त्यापैकी सहा हजार रुपये किमतीची गावठी दारू व त्यासाठीचे साहित्य जागीच नष्ट केले आहे.

याप्रकरणी एक अनोळखी महिला व तीन पुरुष यांच्याविरोधात गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. ही कारवाई विरार गुन्हे कक्ष ३ चे पोलीस निरीक्षक प्रमोद बडाख, पोलीस उपनिरीक्षक शिवाजी खाडे, उमेश भागवत व त्यांच्या पथकाने केली आहे.

CamScanner

लोकसत्ता पान-2

# भाजपचे त्र्यंबकेश्वरमध्ये दंगल घडविण्याचे प्रयत्न- पटोले

**लोकसत्ता खास प्रतिनिधी**



**नागपूर :** त्र्यंबकेश्वरमध्ये भाजपशी संबंधित लोकांनी जाणीवपूर्वक वातावरण बिघडवण्याचे काम केले. महाराष्ट्रात जातीय तणाव वाढवून दंगली घडवण्याचे षडयंत्र भाजप व त्यांच्याशी संलग्न संघटना करत असल्याचे मागील काही दिवसातील घटनांमुळे स्पष्ट झाले आहे, असा आरोप काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी केला. प्रदेश काँग्रेस कार्यालयाने आज निवेदन काढले. त्यामध्ये हे आरोप करण्यात आले. निवेदनात पटोले म्हणतात, राज्यातील सामाजिक एकोप्याला गालबोट लावत संभाजीनगर, अकोला, शेवगाव, अहमदनगर व आता त्र्यंबकेश्वरमध्ये जाणीवपूर्वक वातावरण बिघडवण्याचे काम सुरू आहे. त्र्यंबकेश्वरमध्ये हिंदू महासभा, अखिल भारतीय ब्राह्मण महासंघ, भाजप आध्यात्मिक आघाडी, युवा मोर्चा, लव्ह जिहाद संघटना या भाजपच्या उपशाखांनी मंदिराच्या पायऱ्यावर गोमूत्र शिंपडून महाआरती केली. हिंदूशिवाय इतर धर्मांच्या लोकांनी मंदिरात प्रवेश करू नये, असे फलक झळकवले. आपली राजकीय पोळी भाजण्यासाठी भाजप लोकांमध्ये धार्मिक वाद घडवून आणत आहेत. अनाचार्य भोसले, हिंदू महासभेचे आनंद दवे, आमदार नितेश राणे यांच्यासह ज्यांनी त्र्यंबकेश्वरचे वातावरण बिघडवण्यास खतपाणी घातले. त्यांचीच चौकशी फडणवीस यांनी नेमलेल्या 'एसआयटी'ने करावी, अशी मागणी निवेदनात करण्यात आली आहे.

## त्र्यंबकेश्वर गावाचे वातावरण दूषित करण्याचा प्रयत्न

### जितेंद्र आव्हाड यांचा आरोप

**ठाणे :** त्र्यंबकेश्वर मंदिराला एक इतिहास आहे. मंदिर स्थापन झाले तेव्हापासून ते आजपर्यंत जातीय रंग देण्याचे वातावरण त्र्यंबकेश्वरमध्ये झाले नव्हते; परंतु आता संपूर्ण गावाचे वातावरण दूषित केले जात आहे, असा आरोप राष्ट्रवादीचे आमदार जितेंद्र आव्हाड यांनी केला.

आव्हाड यांनी त्र्यंबकेश्वर ग्रामस्थांची एक पत्रकार परिषद गुरुवारी ठाण्यात आयोजित केली होती. त्र्यंबकेश्वर गावाची लोकसंख्या १४ हजार आहे. दररोज ४० हजार भाविक या ठिकाणी येत असतात. मंदिर परिसरात पूजेचे साहित्य विक्री करून कुटुंबाचा उदरनिर्वाह होत असल्याने येथील विक्रेते मंदिराच्या पायरीवर डोके टेकवितात आणि धूप दाखवितात. मात्र आता एखादी संधी साधून संपूर्ण गावाचे वातावरण दूषित केले जात आहे. एका मंदिराचा विषय घेऊन माथी भडकविली जात आहेत. या गावाला उद्ध्वस्त करणे योग्य नाही, असे आव्हाड म्हणाले.



लोकसत्ता पान-9



### शिवकुमार यांना उपमुख्यमंत्रीपद

# कर्नाटकचे मुख्यमंत्रीपद सिद्धरामय्यांनाच

**लोकसत्ता विशेष प्रतिनिधी**

**नवी दिल्ली :** कर्नाटकच्या मुख्यमंत्रीपदाबाबतचा पेच अखेर गुरुवारी संपुष्टात आला. सिद्धरामय्या यांची मुख्यमंत्रीपदी, तर डी. के. शिवकुमार यांची उपमुख्यमंत्रीपदी नियुक्ती केल्याची घोषणा काँग्रेसचे संघटना महासचिव के. सी. वेणुगोपाल यांनी गुरुवारी पत्रकार परिषदेत केली. त्यानंतर काँग्रेस विधिमंडळ पक्षाने सायंकाळी बैठकीत सिद्धरामय्या यांची नेतेपदी निवड केली. शनिवारी दुपारी १२.३० वाजता सिद्धरामय्यांच्या मंत्रिमंडळाचा शपथविधी होईल.

मुख्यमंत्रीपदाचा तिढा सोडवण्यात काँग्रेसच्या माजी अध्यक्ष सोनिया गांधी यांनी अपेक्षेप्रमाणे मध्यस्थी केल्याची चर्चा आहे. मुख्यमंत्रीपदासाठी आग्रही भूमिका घेणाऱ्या शिवकुमार यांना बुधवारी रात्री सोनिया गांधी यांनी फोन केल्यानंतर त्यांनी नमते घेतले आणि पक्षाध्यक्ष मल्लिकार्जुन खरगेंचा प्रस्ताव मान्य केला. रात्रभर *(पान २ वर)*

लोकसत्ता पु. पा. ४

## वसईत 'निर्भय बनो' आंदोलन सभा

**वसई :** सध्या देशात केंद्र सरकारकडून सुरू असलेल्या दडपशाही व हुकुमशाहीविरोधात 'निर्भय बनो' आंदोलन सुरू करण्यात आले आहे. याच पार्श्वभूमीवर देशातील सद्यस्थिती; राजकीय स्थिती यावर जनजनजागरण सभा आयोजित करण्यात आली आहे. ही सभा रविवार, २१ मे रोजी दुपारी ४.३० वाजता सहयोग मंडळ, घोटकाल येथील खुले मैदान, नंदाखाल, विरार येथे होणार आहे. यावेळी प्रमुख वक्ते म्हणून ज्येष्ठ पत्रकार निखिल वागळे, राजकीय आणि सामाजिक विश्लेषक डॉ. विश्वंभर चौधरी, ज्येष्ठ कायदेतज्ज्ञ ॲड. असीम सरोदे हे मार्गदर्शन करणार आहेत.

CamScanner

लोकसत्ता पु.५१.४

## बोगस डॉक्टरविरोधात गुन्हा दाखल

**वसई :** विरारमधील नारंगी फाटा येथे दवाखाना चालविणाऱ्या बोगस डॉक्टरविरोधात वसई-विरार महापालिकेने गुन्हा दाखल केला आहे. असगर मकुमुद्दीन शेख (वय ४४) असे या बोगस डॉक्टरचे नाव आहे.

पालिकेच्या वैद्यकीय अधिकारी डॉ. तृप्ती कोकाटे यांनी याबाबत अर्नाळा सागरी पोलीस ठाण्यात तक्रार दिली होती. नारंगी फाटा येथील भास्कर सदन इमारतीत शेख हा दवाखाना चालवत होता. त्याच्याकडे कोणतेही वैद्यकीय प्रमाणपत्र आढळून न आल्याने त्याच्याविरोधात कलम ४२० तसेच वैद्यकीय व्यावसायिक अधिनियम १९६१ च्या कलम ३३, ३३ ए तसचे औषधी प्रसाधने कायदा १९४० चे कलम १८ सी, १८ ए (आय) आणि २७ बी अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

लोकसत्ता पु.५१.४

## समलैंगिक नागरिकांच्या हक्कांसाठी फेरी

**वसई :** समलैंगिक तसेच तृतीयपंथीयांना न्याय व हक्क आणि सन्मान मिळवून देण्यासाठी 'वसई-विरार प्राइड फेस्टिव्हल' आयोजित करण्यात आला आहे. या अंतर्गत शनिवार, २७ मे रोजी 'एलजीबीटी' समूहाची फेरी काढण्यात येणार आहे.

समलैंगिक, तृतीयपंथी यांना समाजात सन्मानाने जगता यावे. त्यांना त्यांचे न्याय हक्क मिळावेत, यासाठी चळवळ सुरू करण्यात आली आहे. त्याचा एक भाग म्हणून 'वसई-विरार प्राइड फेस्टिव्हल' आयोजित करण्यात आला आहे. या अंतर्गत 'एलजीबीटी प्राइड मार्च' काढण्यात येणार आहे. शनिवार, २७ मे रोजी सायंकाळी ५ वाजता माणिकपूर येथील क्रिकेट मैदानापासून दत्तानी क्यूबपर्यंत फेरी काढली जाणार आहे. त्यात समलैंगिक, तृतीयपंथी आणि विविध समविचारी नागरिक सहभागी होणार आहेत. समलैंगिक व्यक्तींना लग्नाचा आणि दत्तक अधिकार मिळावा, याबाबत जनजागृती निर्माण करणे, या समूहाविरोधात होणाऱ्या अत्याचारांबाबत आवाज उठवणे आदी मागण्या यावेळी करण्यात येणार आहेत. 'एलजीबीटी' समूहाला नैराश्यातून बाहेर काढून आत्मसन्मान मिळवून देण्यासाठी आम्ही प्रयत्न करत असून त्याचाच एक भाग म्हणून ही फेरी काढण्यात येणार असल्याची माहिती आयोजक नक्षत्र बागवे यांनी दिली.

लोकसत्ता पु.५१.४

# अपघातग्रस्त टँकर दोन दिवसांपासून रस्त्यावर

### पुन्हा अपघाताची शक्यता

**लोकसत्ता विशेष प्रतिनिधी**



**वसई :** पाण्याच्या टँकर एका राजकीय पक्षाच्या कार्यालयास धडकल्याची घटना बुधवारी सकाळी नालासोपारा येथील तुळींज येथे घडली होती. या अपघातात टँकरचा पूर्णपणे चक्काचूर झाला आहे. क्रेनद्वारे हा टँकर बाहेर काढण्यात आला आहे. परंतु, अपघातग्रस्त टँकर याच ठिकाणी रस्त्यावर ठेवल्यामुळे नव्याने अपघाताची शक्यता निर्माण झाली आहे.

पाण्याचा एक टँकर बुधवारी सकाळी संतोष भुवनवरून नालासोपाऱ्याच्या दिशेने येत होता. मात्र, अचानक या टँकरचे ब्रेक निकामी झाल्याने चालकाचे नियंत्रण सुटले. टँकर वेगात असल्याने चालकाने रस्त्यावरील पादचाऱ्यांना वाचवण्याच्या प्रयत्न केला असता तो थेट तुळींज रस्त्यावरील बहुजन विकास आघाडीच्या कार्यालयाला धडकला. या टँकरचा वेग एवढा प्रचंड होता की थेट दरवाजा तोडून तो कार्यालयात शिरला. यावेळी कार्यालयात असलेली महिला सफाई कर्मचारी बचावली आहे. मात्र, टँकर चालकास किरकोळ दुखापत झाली आहे.

या अपघातामुळे या परिसरात मोठी वाहतूककोंडी झाली होती. शेवटी क्रेनद्वारे टँकर बाहेर काढण्यात आला. मात्र, गुरुवारी दिवसभर हा टँकर रस्त्याच्याकडेला ठेवण्यात आला होता. त्यामुळे पुन्हा अपघात होण्याचा धोका आहे. दरम्यान, या अपघातप्रकरणी तुळींज पोलिसांनी टँकरचालकाविरोधात विविध कलमान्वये गुन्हा दाखल केला आहे.

लोकमत पु.५१.३

# ॲडमिशनच्या नावाने ४१ लाखांचा गंडा

### भाईंदर पोलिस ठाण्यात केला दाम्पत्यावर गुन्हा दाखल

लोकमत न्यूज नेटवर्क

**मीरा रोड :** पवई येथील एमबीए महाविद्यालय दूर असल्यामुळे मीरा रोड येथील महाविद्यालयात एमबीएचे अॅडमिशन करून देण्याच्या नावाखाली एका दाम्पत्याने विद्यार्थ्यांच्या कुटुंबांची ४१ लाख १७ हजारांना फसवणूक केल्याप्रकरणी भाईंदर पोलिस ठाण्यात गुन्हा झाला आहे.

भाईंदर पश्चिमेच्या मुर्धा गावात राहणारा प्रतीक पाटील (२२) याने २०२२ मध्ये बॅचलर ऑफ फायनान्शियल मार्केट्समध्ये बीकॉमची डिग्री घेतली. आयबीसॅट परीक्षा उत्तीर्ण झाल्यानंतर त्याला मुंबईतील पवईच्या इक्फाय बिझिनेस स्कूल (आयबीएस कॉलेज)मध्ये अॅडमिशन झाले. मात्र, रोजचे येणे-जाणे त्रासदायक ठरत असल्याने प्रतीक याने जवळपासच्या परिसरात महाविद्यालय शोधत होता. त्याची आई मनीषा यांच्या ओळखीतल्या ज्योती नयन पटेल (रा. बेस्टनगर, गोरेगाव) यांना याबद्दल जुलै २०२२ मध्ये सांगितले होते. ऑगस्टमध्ये ज्योती हिने पती नयन यांची मीरा रोडच्या दालमिया महाविद्यालयात असल्याचे सांगितले. त्यानंतर ज्योती व नयन हे प्रतीकच्या घरी गेले. त्यांनी आई आजारी असल्याचे कारण दाखवून न्यायालयातून तसे प्रतिज्ञापत्र बनवून घेऊन आणि दालमिया महाविद्यालयात एमबीएमध्ये १३ लाख फी भरून अॅडमिशन करून देणार असल्याचे सांगितले. त्यानंतर दोघांनी प्रतीककडून रोखीने तीन लाख व बँक खात्यात ऑनलाइनद्वारे ३८ लाख १७ हजार रुपये उकळले.

#### धनादेश वटलाच नाही

प्रतीक याने पटेल दाम्पत्याने दिलेल्या धनादेशापैकी १० लाखांचे धनादेश बँकेत टाकले असता स्वाक्षरी चुकीची असल्याच्या कारणाने वटला नाही. पटेल दाम्पत्याने आपली फसवणूक केल्याचे लक्षात आल्याने प्रतीकच्या फिर्यादीवरून भाईंदर पोलिसांनी १६ मे रोजी गुन्हा दाखल केला आहे.

CamScanner

(४)

लोकसत्ता पृ. पा. ९

# पुरापाडा पुलाच्या कामासाठी निकृष्ट साहित्य

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**वसई :** विरार पश्चिमेच्या पुरापाडा येथे पालिकेच्या बांधकाम विभागाकडून नवीन पूल तयार करण्याचे सुरू करण्यात आले आहे. मात्र त्या पुलाच्या बांधकामासाठी ठेकेदाराकडून निकृष्ट दर्जाचे साहित्य वापरले जात असल्याचा आरोप नागरिकांनी केला आहे.

विरार पश्चिमेच्या भागात पुरापाडा परिसर आहे. या परिसरातील खाडीवर जुना असलेला पूल कमकुवत झाल्याने त्या ठिकाणी पालिकेकडून नवीन पूल उभारणी करण्याचे काम हाती घेण्यात आले आहे.

या पुलाच्या बांधकामासाठी सुमारे दीड कोटी रुपये इतका निधी खर्च



केला जाणार आहे.

या सुरू असलेल्या पुलाच्या कामासाठी ज्या लोखंडी सळया वापरल्या आहेत त्या आवरण (कोटिंग) नसलेल्या व गंजून गेलेल्या सळया वापरल्या जात असल्याचे येथील नागरिकांनी सांगितले आहे. सदरचा भाग खारभूमीचा परिसर आहे. त्यामुळे क्षारयुक्त पाण्याचा अधिक संपर्क येतो. अशा ठिकाणी पूल तयार करताना निकृष्ट दर्जाचे साहित्य वापरले जात असेल तर एकंदरीत पुलाच्या बांधकामावर प्रश्न उपस्थित होत आहे असे सामाजिक कार्यकर्ते महेश भोईर यांनी सांगितले आहे.

या पुलावरून रहदारी होणार आहे असे जर निकृष्ट दर्जाचे काम होत असेल तर हे धोकादायक असल्याचे भोईर यांनी सांगितले.

बांधकामासाठी वापरण्यात येत असलेल्या सळया या आवरण असलेल्या वापरणे गरजेचे होते. पालिकेनेसुद्धा सदर बांधकामाची योग्य ती तपासणी करायला हवी होती, असे भाजपचे मनोज पाटील यांनी सांगितले आहे.

सदर निकृष्ट दर्जाचे साहित्य वापरून होत असलेल्या कामाची माहिती पालिकेचे अभियंता यांच्या निदर्शनास आणून दिली आहे. याबाबतची पाहणी करून योग्य ती कार्यवाही केली जाईल, असे उत्तर येथील नागरिकांना देण्यात आले आहे.

पुढारी पान-७

# घरपट्टी विभागात ७२ लाखांचा घोटाळा

## धक्कादायक : वसई-विरार महापालिकेच्या करअधीक्षकाचे निलंबन

**वसई : पुढारी वृत्तसेवा**

वसई-विरार महापालिकेच्या मागील तीन वर्षांच्या प्रशासकीय काळात घनकचरा व्यवस्थापन विभाग, बांधकाम विभाग, अनधिकृत बांधकाम नियंत्रण कक्ष व पाणीपुरवठा विभागासह अन्य विभागांतील कर्मचारी-अधिकाऱ्यांचे अनेक गैरव्यवहार व घोटाळे समोर आलेले असताच भ्रष्टाचाराची ही माळ थांबता थांबलेली नाही. हे सगळे घोटाळे ताजे असतानाच वसई-विरार महापालिकेची मान शरमेने खाली घालायला लावेल असा आणखी एक आर्थिक घोटाळा समोर आला आहे.

वसई-विरार महापालिका प्रभाग समिती सी घरपट्टी विभागातील तब्बल ७२ लाख ६८ हजार ८९९ लाखांच्या या आर्थिक गैरव्यवहारावर शिक्कामोर्तब झाले असून; या प्रकरणी एका कर अधीक्षकाचे बुधवारी (१७ मे) निलंबन झाले आहे. अरुण एस. जानी असे या कर्मचाऱ्याचे नाव असून; घरपट्टी-पाणी पट्टी स्वरूपात जमा झालेली रक्कम ते बाजारात व्याजाने व अन्य व्यवहारात फिरवत असल्याचा संशय होता. या प्रकरणातील गांभीर्य लक्षात घेऊन वसईतील पर्यावरण अभ्यासक चरण भट यांनी चौकशीची मागणी केली होती. चरण भट यांच्या तक्रारीची दखल घेत आयुक्त अनिलकुमार पवार यांनी संबंधित विभागाकडून चौकशी अहवाल मागवला होता.

चौकशीअंती या कर्मचाऱ्यांवर योग्य ती कारवाई करण्यात येणार असल्याचे माहिती पालिका आयुक्त अनिलकुमार पवार यांनी संकेत दिले होते. विशेष म्हणजे आयुक्त अनिलकुमार पवार यांना प्राप्त झालेल्या चौकशी अहवालात अरुण एस. जानी यांनी १८ एप्रिल २०२३ ते १६ मे २०२३ या कालावधीत जमा ७२ लाख ६८ हजार ८९९ लाखांचा कर पालिकेत भरणा केला नसल्याचे निदर्शनास आले आहे.

### पैशांच्या हेराफेरीत अन्य कर्मचाऱ्यांचाही समावेश

आपल्या कृत्याची कुणकुण लागताच जानी यांनी बुधवारी दुपारी तातडीने २६ लाख २२ हजार ६६० रुपये इतकीच रक्कम पालिकेत भरणा केल्याचे समजते. तर उर्वरित ४६ लाख ४६ हजार २३९ इतकी रक्कम अद्याप भरणा केलेली नाही. कर अधीक्षक अरुण जानी यांचे हे कृत्य आर्थिक अपहाराचे असून महाराष्ट्र महापालिका नागरी सेवा (वर्तणूक) अधिनियम १९७९ चे कलम ३ चा भंग करणारे असल्याने आयुक्त अनिलकुमार पवार यांनी जानी यांना निलंबित केले आहे. सामान्य करदात्या नागरिकांच्या पैशांची हेराफेरी करणाऱ्या व्यक्तींमध्ये अरुण एस. जानी यांच्या व्यतिरिक्त अन्य कर्मचाऱ्यांचाही समावेश आहे. त्यामुळे केवळ एका अधीक्षकाला निलंबित करून भागणार नाही. या संपूर्ण प्रकरणाची चौकशी करून या गैरव्यवहारात सहभागी सर्व कर्मचाऱ्यांचे निलंबन केले जावे, अशी मागणी चरण भट यांनी केली आहे.



> "वसई-विरार महापालिकेने या प्रकरणी आणखी खोलात जाऊन चौकशी करणे अपेक्षित आहे. या माध्यमातून आणखी अनेक घोटाळे समोर येण्याची शक्यता आहे. अनेकांचा सहभाग त्यात असू शकेल. या प्रकरणात सहायक आयुक्त गणेश पाटील आणि अन्य कर्मचारी यांनाही निलंबित केले गेले पाहिजे. कारण कर भरणा करून घेणे, ही त्यांचीही जबाबदारी होती. शिवाय अरुण जानी यांच्याविरोधात आर्थिक गैरव्यवहार प्रकरणी अद्याप गुन्हा दाखल झालेला नाही. याचा अर्थ या प्रकरणात केवळ निलंबन करून तडजोड केली गेली असावी, ही शक्यता आहे.
>
> -चरण भट, पर्यावरण अभ्यासक

(७)

पुढारी पान-४

# संदल मिरवणुकीच्या वेळी धूप दाखविण्याची परंपरा शंभर वर्षे जुनी

**ठाणे :** पुढारी वृत्तसेवा

नाशिक येथील सुप्रसिद्ध त्र्यंबकेश्वर मंदिराच्या पायऱ्यांवर डोके ठेवून धूप दाखविण्याची शंभर वर्षांची परंपरा असून कुणीही मुस्लिम मंदिरात घुसलेले नाही. मंदिरातील तैनात नवीन सुरक्षा रक्षकांना ही माहिती नसल्याने त्यांनी धूप घालण्यासाठी आलेल्या आमच्याच गावातील त्या चार जणांना अडवले आणि काही लोकांनी वातावरण बिघडवून त्र्यंबकेश्वर मंदिराला बदनाम करण्यास सुरवात केली आहे, असा आरोप त्र्यंबकेश्वरमधील ग्रामस्थांनी ठाण्यात गुरुवारी घेतलेल्या पत्रकार परिषदेत केला.

कुठलीही दंगल झालेली नाही. मात्र मीडिया, सोशल मीडियावर भीतीचे वातावरण तयार केले जात असल्याने भाविकांची संख्या घटू लागली आहे. वास्तविक धूप घेऊन येणारा सलीम सय्यद आणि अन्य तीन जण हे पिढ्यान पिढ्या गावात राहत असून ते आजपर्यंत कधीच मंदिरात गेलेले नाही. उलट मंदिराच्या बाहेर व्यवसाय करताना भाविकांना मदत करीत असतात. कारण नसताना बाहेरून लोकांनी धार्मिक राजकारण करून उपमुख्यमंत्र्यांना अर्धवट माहिती दिली. त्यामुळे एस. आय. टी. चौकशीची गरज नसून गृहमंत्र्यांनी ती मागे घ्यावी, अशी मागणी यावेळी करण्यात आली. यावेळी माजी नगराध्यक्षासह राष्ट्रवादीचे आमदार तथा नाशिककर असलेले जितेंद्र आव्हाड उपस्थित होते.

दोन महिन्यापूर्वीच राज्यात दंगली घडविल्या जातील असे मी एका कार्यक्रमात बोललो होतो. त्यानंतर देशाचे गृहमंत्री अमित शहा यांच्यासह काही नेत्यांनी भीती व्यक्त केली होती, त्यावेळी माझ्यावर टीका झाली होती. प्रत्यक्षात दंगली घडवून राजकीय पोळी भाजण्याचे काम केले जात असल्याचा आरोप आमदार जितेंद्र आव्हाड यांनी केला आहे.

## त्र्यंबकेश्वरात दंगलीचा डाव गावकऱ्यांनी उधळला : पटोले

**मुंबई :** महाराष्ट्रात जातीय तणाव वाढवून दंगली घडवण्याचे षड्यंत्र भारतीय जनता पक्ष व त्याच्याशी संलग्न संघटना करत आहेत. त्र्यंबकेश्वरला धूप दाखवण्याची परंपरा शेकडो वर्षांची आहे. गावकऱ्यांनी सामंजस्याची भूमिका घेऊन भाजपचा दंगल घडवण्याचा डाव हाणून पाडला, असे काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले म्हणाले.

## त्र्यंबकेश्वरला आखाडा परिषदेची सत्यशोधन समिती

**त्र्यंबकेश्वर :** अखिल भारतीय आखाडा परिषदेच्या साधूंची येथील नीलपर्वतावर बैठक होऊन त्यात मंदिरात अन्य धर्मीयांच्या प्रवेशाबाबत सखोल चर्चा करण्यात आली. याप्रकरणी सविस्तर माहिती घेत तेथील परंपरा जाणून घेण्यासाठी सर्वानुमते सात साधूंची सत्यशोधन समिती नेमण्यात आली आहे.

पुढारी पान-५

### गडचिरोलीतील बोगस प्रकरण उघड झाल्यानंतर रायगड पोलीस अलर्ट

# भावी पोलिसांच्या कागदपत्रांसाठी गावागावात 'सर्च ऑपरेशन'

अलिबाग, दि.१८ (प्रतिनिधी) - गडचिरोली जिल्ह्यातील पोलीस भरतीत काही उमेदवारांनी प्रकल्पग्रस्त असल्याचे बोगस प्रमाणपत्र दिल्याचे उघड झाले होते. विशेष म्हणजे याचे कनेक्शन थेट रायगडपर्यंत पोहोचले असून पोलीस शिपाई सिद्धेश पाटीलला अटक करण्यात आली आहे. त्यामुळे जिल्ह्यातील पोलिसांच्या भरती प्रक्रियेत कोणतीही कसर राहू नये याकरिता पात्र उमेदवारांच्या दाखल्यांची पडताळणी करण्यासाठी खास पथक तयार करण्यात आले आहेत. पोलिसांची ही टीम या भावी पोलिसांच्या गावात कागदपत्रांचे 'सर्च ऑपरेशन' करणार आहे.



**प्रकल्पग्रस्तांच्या दाखल्यांची तपासणी करण्यासाठी खास पथक**

जानेवारी महिन्याच्या पहिल्या आठवड्यापासून पोलीस भरती प्रक्रिया सुरू आहे. या भरतीत जिल्ह्यातील पोलीस शिपाई व पोलीस चालक पदांसाठी २७८ उमेदवार पात्र ठरले आहेत. दरम्यान, गडचिरोली जिल्ह्यात बोगस प्रकल्पग्रस्त प्रमाणपत्र प्रकरण उघडकीस आले. यामध्ये रायगड पोलीस दलातील पोलीस शिपाई सिद्धेश पाटील याचा समावेश असल्याचे निष्पन्न झाल्याने गडचिरोली पोलिसांनी २८ एप्रिल रोजी त्याला अलिबागमधून ताब्यात घेतले. या घटनेनंतर रायगड पोलीसदेखील अलर्ट मोडवर आले आहेत. सदर प्रकल्पग्रस्त उमेदवार हे सोलापूर, बीड, संभाजीनगर, नाशिक, पुणे, सातारा जिल्ह्यातील आहेत.

## ३५ उमेदवारांच्या घरी टकटक

रायगड पोलीस दलातील पोलीस भरतीमध्ये पात्र ठरलेल्या उमेदवारांपैकी ३५ उमेदवार हे प्रकल्पग्रस्त आहेत. या प्रकल्पग्रस्त असलेल्या उमेदवारांच्या गावात जाऊन प्रकल्पग्रस्त प्रमाणपत्राची तपासणी केली जात आहे. तलाठ्यांमार्फत त्यांची माहिती घेऊन त्यांचा सातबारा व प्रकल्पासाठी गेलेली जमीन याची सविस्तर माहिती घेतली जात आहे. मागील दहा दिवसांपासून रायगड पोलिसांनी या प्रकल्पग्रस्त उमेदवारांची तपासणी सुरू केली आहे. त्यासाठी स्वतंत्र पथक तयार केले असल्याची माहिती रायगड पोलिसांकडून देण्यात आली आहे.

> गडचिरोली प्रकरणानंतर जिल्ह्यात झालेल्या पोलीस भरती प्रक्रियेतील प्रकल्पग्रस्त उमेदवारांची कसून चौकशी सुरू केली आहे. त्यासाठी स्वतंत्र यंत्रणा गेल्या अनेक दिवसांपासून काम पाहत आहे.
>
> **- सोमनाथ घार्गे, पोलीस अधीक्षक, रायगड**

CamScanner

पुढरी पा. ८

(6)

# अनधिकृत बांधकामाला आशीर्वाद ?

**विरार : पुढारी वृत्तसेवा**

वसई-विरार महानगरपालिकेतील प्रभाग समिती ई विभागातील १८ अनधिकृत बांधकामांवर कारवाई करण्यास असमर्थता दर्शवणाऱ्या प्र.सह.आयुक्त निता कोरे, ठेका कनिष्ठ अभियंता व तत्कालीन उपायुक्त यांची सखोल चौकशी करून त्यांच्यावर फौजदारी गुन्हा दाखल करण्याचे आदेश महाराष्ट्र शासनाच्या अप्पर सचिव निकेता पांडे यांनी पालिका आयुक्त अनिलकुमार पवार यांना दिले आहेत.

अनधिकृत इमारतींवर कारवाई करण्याबाबत वरील विभागाच्या या अधिकाऱ्यांनी प्रभारी सहआयुक्त निता कोरे व ठेका कनिष्ठ अभियंता कृतार्थ ठाणगे तसेच अनधिकृत व अतिक्रमण विभागाचे तत्कालीन उपायुक्त अजित मुठे यांच्याकडे कारवाईसाठी तक्रार करण्यात आली होती. काहीच कारवाई होत नसल्याने हे आदेश पालिका आयुक्तांना देण्यात आले.

लोकमत पु. पा.-३

# टास्क पूर्ण करण्यास सांगून पाच लाखांना फसवले

लोकमत न्यूज नेटवर्क

**मीरा रोड :** हॉटेलना रेटिंग देण्याचे ऑनलाइन टास्क पूर्ण करण्याच्या बदल्यात चांगला मोबदला देण्याचे प्रलोभन दाखवून भाईंदरच्या एका व्यक्तीला सायबर लुटारूंनी पाच लाख ९ हजार रुपयांना फसवले आहे. मुकेशकुमार वर्मा (४१), असे फसवणूक झालेल्याचे नाव आहे. 'ट्रीवागो - प्लॅटफॉर्म डॉट कॉम' या लिंकवरून ही फसवणूक झाली आहे.

भाईंदर पूर्वेत इंद्रलोक फेज-३ येथील मुकेशकुमार हे एका कंपनीत बिलिंग विभागात काम करतात. टेलिग्रामवर त्यांना नोकरीच्या अप्लिकेशनसोबत हॉटेलना रेटिंग दिल्यास कमिशन देण्याचे प्रलोभन संदेशाद्वारे दिले. लिंकवर माहिती भरताच युझर आयडी क्रमांक मिळाला. त्यानंतर तीन टास्क देण्यात येणार असून, एका टास्कमध्ये २८ हॉटेलना रेटिंग द्यायचे असल्याचे सांगितले होते. नवघर पोलिस ठाण्यात दिलेल्या तक्रारीवरून गुन्हा दाखल झाला आहे.




## ...अशी झाली फसवणूक

- मुकेश यांना वेगवेगळ्या हॉटेलची छायाचित्रे पाठवण्यात आली.
- **टास्क पूर्ण करताच त्यांच्या ॲपवर ८०० रुपये कमिशन आल्याचे दिसले.**
- ते त्यांनी पेटीएमद्वारे काढले. त्यानंतर १० हजार अनामत रक्कम भरण्यास सांगण्यात आले आणि आणखी एक लिंक पाठवली. तसेच दोन हजार रुपये स्वागत बोनस मिळणार असल्याचे सांगितले.
- **मुकेश यांनी १० हजार भरल्यानंतर त्यांनी आणखी काही टास्क पूर्ण केले म्हणून त्यांच्या ॲपवर १७ हजार जमा झाले.**
- पाच लाख ९ हजार इतकी रक्कम भरल्यानंतर त्यांना आणखी एका टास्कसाठी नऊ लाख ४६ हजार रुपये भरा, असे सांगण्यात आले.

लोकमत पान-१२

तुळजाभवानी मंदिर प्रशासनाचा यू टर्न

# तोकड्या कपड्यांचा नियम मागे

लोकमत न्यूज नेटवर्क

**तुळजापूर (जि. धाराशिव) :** साडेतीन शक्तिपीठांपैकी एक पूर्ण शक्तिपीठ असलेल्या श्री तुळजाभवानी देवीच्या मंदिरामध्ये अंगप्रदर्शक कपडे परिधान करून येणाऱ्या भाविकांना ' नो एन्ट्री' करण्यात आली होती. तसे फलक मंदिर परिसरात जागोजागी लावण्यात आले होते. नंतर गुरुवारी रात्री उशिरा हा निर्णय मागे घेण्यात आला.

श्री तुळजाभवानी देवीच्या दर्शनासाठी देशाच्या कोनाकोपऱ्यातून भाविक येतात. दर्शनासाठी येताना अंगावर कोणत्या स्वरुपाचे कपडे परिधान करायला हवेत, याबाबत कुठलेही नियम वा बंधने यापूर्वी नव्हती.



**लावले होते फलक**

**मंदिरात येताना भाविकांचा ड्रेसकोड काय असावा याबाबत भाविकांना आवाहन करणारे असे फलक लावले होते.**

## या कपड्यांवर होते निर्बंध

जे भाविक अंग प्रदर्शक, उत्तेजक, असभ्य, अशोभनीय (वेस्टर्न) तसेच हाफ पॅन्ट व बर्मुडा परिधान करून येतील, त्यांना श्री तुळजाभवानी देवीच्या दर्शनासाठी मंदिरात प्रवेश दिला जाणार नाही. ही माहिती भाविकांपर्यंत पोहोचविण्यासाठी मंदिर परिसरात याबाबतचे फलकही लावले होते. गुरुवारपासून याची प्रत्यक्ष अंमलबजावणी सुरू झाली होती.

मंदिराची शालीनता कायम राहावी, यासाठी भाविकांना कपड्यांबाबत असा तोंडी निर्णय घेतला गेला होता. रेकॉर्डवर असा निर्णय नसल्याचे लक्षात आल्यानंतर कोणतेही निर्बंध लागू नसल्याचे प्रगटन आपण काढले आहे. **- सौदागर तांदळे,** तहसीलदार तथा मंदिर व्यवस्थापक

CamScanner

लोकमत

# बोगस डॉक्टरवर कारवाई

लोकमत न्यूज नेटवर्क

नालासोपारा : विरारमध्ये एका बोगस डॉक्टरवर कारवाई करण्यात आली आहे.

नारंगी फाटक, भास्कर सदन बिल्डिंग रोड येथे अजगर नकुमुद्दीन शेख (४४) यांनी २० एप्रिलला नॅचरोपॅथीची व अल्टरनेटिव्ह मेडिसिनची प्रॅक्टिस न करता ॲलोपॅथिक औषधांचे अजगर अली क्लिनिक नावाने दुकान उघडून प्रॅक्टिस करत असल्याचे निदर्शनास आले होते. सदर क्लिनिकमध्ये बायोमेडिकल सर्टिफिकेट व महाराष्ट्र प्रदूषण कंट्रोल बोर्ड हे सर्टिफिकेट नसल्यामुळे आरोपीविरोधात बुधवारी अर्नाळा पोलिसांनी वैद्यकीय व्यावसायिक अधिनियम कलमाखाली गुन्हा दाखल केला आहे.

Hello Vasai
Page No. 4 May 19, 2023
Powered by: erelego.com

CamScanner

# 15 साल से फरार आरोपी सतारा से हुए गिरफ्तार



**वसई** । एमबीवीवी पुलिस आयुक्तालय अंतर्गत मध्यवर्ती अपराध जांच शाखा ने लगभग 15 वर्षों से डकैती के 03 एवं मोक्का के 01 मामलों में वांछित आरोपी को गिरफ्तार किया है। यह सफलता क्राइम डीसीपी अविनाश अंबुरे व एसीपी अमोल मांडवे के मार्गदर्शन में मध्यवर्ती अपराध जांच शाखा के पो.नि.राहुल राख की टीम ने पाई है।यह जानकारी पुलिस अधिकारी ने मंगलवार को दी है।

पुलिस ने बताया कि 21 अगस्त 2008 में काशिदकोपर फाटा,मांडवी,विरार या स्थान पर रेखा काशिनाथ चौधरी (45) रहती है। वह एक मकान में सो रही थी,वहीं आरोपी टेचर बंडया काले और उसके साथियों ने आपस में सांठगांठ कर हाथ में लोहे की औजार लेकर,उसने शिकायतकर्ता के बंद दरवाजे को लात मारकर घर के दरवाजे के हैंडल को तोड़ दिया और घर में घुस गया,शिकायतकर्ता व उसके पति को लोहे की रॉड से मारापीटा,उनके शरीर पर से 17,000 रुपये कीमती सोने के जेवरात जबरदस्ती छीन कर फरार हो गए थे।

CamScanner

# 'क्राइम ब्रांच-2' की टीम ने महिला सहित 3 चोरों को किया गिरफ्तार

## 10 लाख से अधिक का माल किया बरामद




जागरण ज | आर.आर. सिंह

**वसई ।** एमबीवीवी पुलिस आयुक्तालय अंतर्गत क्राइम ब्रांच 2 वसई युनिट की टीम ने एक ऐसी गुत्थी सुलझाई है। अपराध के घटित होने के 3 दिन के भीतर क्राइम ब्रांच 2 की टीम ने अपराध में अज्ञात आरोपियों के नामों का पता लगाकर उन्हें हिरास्त में लेने तथा षड्यंत्र को सुलझाने में सफलता मिली है।

उक्त गुत्थी को सुलझाने के लिए टीम ने तकरीबन 150 से अधिक सीसीटीवी फुटेज को खंगाला था। यह कार्रवाई डीसीपी (क्राइम) अविनाश अंबुरे व एसीपी अमोल मांडवे के मार्गदर्शन में क्राइम ब्रांच 2 युनिट के पी.आई शाहूराज रणवरे, सपोनिरी सुहास कांबले व सपोनिरी सागर शिंदे की टीम ने की है। पुलिस ने बताया कि 9 मई 2023 शाम 5;30 बजे से 10 मई 2023 सुबह 10:25 के दरम्यान शिकायतकर्ता निकहत असगर खान (38) वसई प.स्थित के घर अज्ञात का चोर द्वारा ताला तोड़कर बेडरूम के कपाट के तिजोरी का लॉक तोड़कर 10 लाख 30हजार रुपये का आभूषण व नगदी चोरी करके फरार हो गया।इस मामले में निकहत की शिकायत पर माणिकपुर थाने में अज्ञात चोर के ऊपर विभिन्न धाराओं के तहत केस दर्ज किया गया था।

पुलिस अधिकारी ने बताया कि,उक्त मामला दर्ज किये जाने की सूचना मिलते ही वरिष्ठों के आदेश पर उक्त अपराध स्थल का सी.सी.टी.वी कैमरे के फुटेज की जांच की गई, तो अपराध में आरोपी पाया गया,घटनास्थल और तकनीकी जांच से मिले फुटेज से आरोपी का नाम पता करने के बाद उसे गिरफ्तार करने के लिए अलग-अलग टीमों का गठन कर आरोपियों की तलाश शुरू की गई। उक्त अपराध में आरोपी मोहम्मद कमर रौफ खान (28) को गोवंडी, मुंबई से हिरासत में लिया,उक्त आरोपी से की गई पूछताछ में पाया गया कि उक्त अपराध उसका सहयोगी मित्र नसीम मोईन खान (40),निवासी- वसई पश्चिम द्वारा उक्त अपराध किया था,ऐसा खुलासा हुआ है।

उक्त आरोपी नसीम मोइन खान के मोबाइल फोन के तकनीकी विश्लेषण के अनुसार,उक्त आरोपी को फाउंटेन होटल,घोड़बंदर रोड, काशीमीरा से हिरासत में लिया गया।उपरोक्त नामजद आरोपियों की विवेचना में उक्त अपराध में आरोपी शिकायतकर्ता निकहत असगर खान उम्र 38 वर्ष,निवासी- वसई पश्चिम, वह अपने पति द्वारा समय-समय पर विदेश से भेजे गए धन को खर्च करती थी,पति के लौटने के बाद खर्च की गई राशि के बारे में पति को क्या बताना है, इस असमंजस में रहना, इसी दौरान उसकी मुलाकात उसकी बिल्डिंग में रहने वाले उसके परिचित शख्स नसीम मोईन खान से हुई।

उसके साथ मिलीभगत कर उसने घर में चोरी और चोरी का नाटक किया,और उक्त सोने के गहने शिकायतकर्ता द्वारा अपने भाई के घर शंकेश्वरनगर नालासोपारा पूर्व में ले जाकर छुपा दी,जांच के बाद अपराध से चोरी हुए सोने के गहने और नकदी कुलमिलाकर 10 लाख 30 हजार रुपये का माल जप्त किया गया।

CS CamScanner